जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUL 2018
Times of India

# Only 17 students in fourth round of RTE admissions

Times News Network

The fourth round of admissions under the Right to Education (RTE) quota concluded on Thursday, July 19. According to an official, only 17 students were shortlisted for the fourth round. The data of the number of students who have taken admissions is being compiled. According to the official, till date around 1,200 kids have been enrolled in various schools under the RTE admission process across the district. The official added that there are as many as 3,501 seats reserved for eligible kids in 347 schools across the city and district. The department had received 3,183 applications during the admission process. Still, the department still has to fill up over 2,200 vacant seats.

TOI



Shivaji University signed an MoU with the Sangli-based private firm Samruddhi TBI foundation

**SUK signs MoU with Samruddhi TBI foundation:** Shivaji University, Kolhapur (SUK) has signed a memorandum of understanding (MoU) with Sangli-based private firm Samruddhi TBI foundation this week. According to university officials, the MoU will help promote a sense of entrepreneurship among students. SUK vice-chancellor Devanand Shinde said the MoU would facilitate skill development among students and help generate employment opportunities.

## CAMPUS BUZZ

**10-day workshop on drinking water quality management:** The department of environmental sciences of Shivaji University, Kolhapur organised a 10-day workshop on drinking water quality management, which concluded earlier last week. According to university officials, around 80 students participated in the workshop for which 2 academic credits will be given to them. Officials said a grant was provided by the Union government's Department of Science and Technology to conduct the workshop. Experts from several state and national universities were invited for the workshop. The faculty members of the environmental sciences department too guided participants during the workshop.

लोकमत

# बी. टेक.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि इलिक्सर कन्सलटंटस् लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या कराराअंतर्गत विद्यापीठात बी. टेक. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रोसेस डिझाईन ऑफ पॉवर प्लांट' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. त्यात 'इलिक्सर लिमिटेड'चे विश्वास शिंदे यांनी ऊर्जानिर्मिती क्षेत्रात प्रक्रिया संरचनेबाबत मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करताना कोणकोणत्या प्रकारची कौशल्ये लागतात. ती कशा पद्धतीने आत्मसात करावीत, याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. जयदीप बागी, केमिकल विभागाचे समन्वयक डॉ. प्रवीणकुमार पाटील, आदी उपस्थित होते. प्रा. डी. एम. नांगरे, एस. एम. गायकवाड यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

Kolhapur Main
Page No. 2 Jul 20, 2018
Powered by: erelego.com

## 'त्सिंघुआ'च्या अधिकाऱ्यांची 'मोतीबाग'ला भेट : लाल मातीतील कुस्ती पाहून भारावले; विविध संस्थांना भेटी

# 'हासली' उचलली, 'करेला' फिरविला

लोकमत न्यूज नेटवर्क





कोल्हापुरात गुरुवारी तैवानच्या त्सिंघुआ विद्यापीठाचे प्रा. ह्युअँग यू आणि सिअँग लियू यांनी मोतीबाग तालमीला भेट दिली. यावेळी त्यांच्यासह शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी 'करेला' फिरविण्याचा अनुभव घेतला. दुसऱ्या छायाचित्रात प्रा. ह्युअँग यू, सिअँग लियू, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर यांचे स्वागत कोल्हापूर जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाचे शहराध्यक्ष दादू चौगले यांनी केले. यावेळी शेजारी विनोद चौगले, दीनानाथसिंह, महादेवराव आडगुळे, आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर** : तैवानच्या त्सिंघुआ विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळातील शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू आणि प्रा. सिअँग लियू हे गुरुवारी लाल मातीतील कुस्ती पाहून भारावले. त्यांनी उत्सुकतेपोटी 'हासली' उचलली आणि 'करेला' फिरवून पाहिला.

शिवाजी विद्यापीठ आणि कार्यक्षेत्रातील क्रीडाविषयक सोयी-सुविधांची पाहणी करण्यासाठी आलेल्या 'त्सिंघुआ'च्या शिष्टमंडळाने गुरुवारी दुपारी कोल्हापुरातील मोतीबाग तालमीला भेट दिली. यावेळी कोल्हापूर जिल्हा व शहर राष्ट्रीय तालीम संघाचे शहराध्यक्ष रुस्तुम-ए-हिंद दादू चौगले यांनी प्रा. ह्युअँग यू, सिअँग लियू, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी त्यांना कोल्हापुरी फेटा बांधण्यात आला. त्यानंतर 'मोतीबाग'मधील लहान-मोठ्या मल्लांनी बॅक-थ्रो, साईड-थ्रो, धोबी पछाड, ढाक, कलाजंग, एकेरी पट, दुहेरी पट आदी कुस्तीतील डावांसह जोर-सपाट्या, बैठक अशा व्यायामाची प्रात्यक्षिके मॅटवर सादर केली. त्यानंतर लाल मातीच्या आखाड्यातील कुस्ती आणि गळ्यात लोखंडी चाक (हासली) घालून आणि हातात लाकडी करेला घेऊन व्यायाम करणारे मल्ल पाहून 'त्सिंघुआ'चे अधिकारी भारावले. कुस्ती, व्यायामाच्या प्रकारांचा क्षण आणि क्षण त्यांनी मोबाईलमध्ये टिपून घेतला. कुस्तीविषयक माहिती कुलगुरु डॉ. शिंदे आणि डॉ. अनिल घुले यांच्याकडून जाणून घेतली. जागतिक कुस्ती स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या 'मोतीबाग'चा मल्ल शुभम पाटील याचा सत्कार करण्यात आला. यावेळी हिंदकेसरी दीनानाथसिंह, विनोद चौगले, तालीम संघाचे जनरल सेक्रेटरी ॲड. महादेवराव आडगुळे, उपाध्यक्ष अशोक माने, प्रकाश खोत, कार्याध्यक्ष संभाजी वरुटे, पी. जी. पाटील, सचिव संभाजी पाटील, बाजीराव पाटील, राजाराम चौगले, महापौर केसरी अमृता भोसले, डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. अभिजित वणिरे, प्रशिक्षक प्रवीण कोठावळे, सर्जेराव पाटील, सिकंदर कांबळे, यशवंतराव मुडळे, कृष्णात पाटील, बाजीराव पाटील, आदी उपस्थित होते. दरम्यान, या शिष्टमंडळाने सकाळी सेंट झेवियर्स स्कूलमधील क्रीडा सुविधा जाणून घेतल्या. त्यानंतर न्यू पॅलेसला त्यांनी भेट दिली. दुपारनंतर त्यांनी आष्टा (जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाला भेट दिली.

## कोल्हापूरची क्रीडा परंपरा अवर्णनीय

**कोल्हापुरातील कुस्ती, कबड्डी आदी क्रीडा प्रकारांची परंपरा अवर्णनीय आहे. क्रीडाविषयक हे वेगळे स्पिरीट येथील खेळाडूंमध्ये पाहावयास मिळाले. येथील खेळाडूंचे 'त्सिंघुआ' विद्यापीठात प्रदर्शनीय सामने भरविले जातील, असे प्रा. ह्युअँग यू यांनी सांगितले.**

लोकमत

# तंत्रज्ञान अधिविभागाला १७ कोटींचे अनुदान

## जयदीप बागी : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तंत्रज्ञान अधिविभागाला 'टेक्युप' या जागतिक बँकेच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यांतर्गत एकूण १७.५ कोटींचे अनुदान लाभले आहे. अशा प्रकल्पांतर्गत विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिविभाग कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन शाखेतर्फे आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. त्यामध्ये वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे सहायक प्राध्यापक डॉ. जयेंद्र कुमार यांनी मार्गदर्शन केले. डॉ. एम. के. भानारकर यांनी सांगितले की, नवीन तंत्रज्ञानाचा वेध घेत विद्यार्थ्यांनी वाटचाल केली पाहिजे. त्या दृष्टीने सिम्युलेशन टूलचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रयोगशाळा व सॉफ्टवेअरसारख्या पायाभूत सुविधांवर भर देत तंत्रज्ञान अधिविभाग व विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स (सायन्स) विभाग समन्वयाने काम करील.

या कार्यशाळेचे आयोजन प्रा. उदय पाटील, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन शाखेचे समन्वयक डॉ. एस. बी. चव्हाण, आदींनी केले.

Hello Kolhapur
Page No. 3 Jul 20, 2018
Powered by: erelego.com

# तैवानच्या शिष्टमंडळाची मोतीबाग तालमीस भेट

म.टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामध्ये क्रीडाविषयक माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी तैवान येथून आलेल्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने गुरूवारी भेटीच्या दुसऱ्या दिवशी कोल्हापुरातील सुप्रसिध्द मोतीबाग तालमीस भेट दिली. यावेळी पैलवानांनी दाखविलेली प्रात्यक्षिके पाहून तैवान विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे अधिकारी प्रा.सिअँग लियू, प्रा.ह्युअँग यु हे भारावून गेले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर तसेच कोल्हापूर जिल्हा तालीम संघाचे प्रतिनिधी माजी महापौर महादेवराव आडगुळे, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, दादू चौगुले, विनोद चौगुले,संभाजी वरूटे, संभाजी पाटील आदी उपस्थित होते. मल्लविद्येच्या शास्त्रोक्त माहितीसह या प्रात्यक्षिकांमध्ये कुस्तीपटूंनी ढाक लावणे, धोबी पछाड, मोळी आदी डावांचे सादरीकरण केले.

तत्पूर्वी, सकाळी विद्यापीठ परिसरामध्ये विविध ठिकाणी निर्माण केलेले जलसाठे पाहून शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले. त्यानंतर, शिष्टमंडळाने सेंट झेवीयर्स शाळेस भेट दिली. या ठिकाणी बॅडमिंटन, टेबल टेनिस, स्केटींग, फुटबॉल, बास्केटबॉल, क्रिकेट आदी खेळांच्या मैदांनासह विविध खेळांच्या प्रात्यक्षिकांची पाहणी केली. छत्रपती शहाजी महाराज संग्रहालयाच्या पाहणीनंतर आष्टा येथील डांगे महाविद्यालयामधील विविध क्रीडा विषयक बाबींची माहिती घेण्यासाठी शिष्टमंडळ आष्ट्याकडे रवाना झाले.



मोतीबाग तालीम येथे कुस्तीची प्रात्यक्षिके पाहताना तैवान येथील विद्यापीठाचे शिष्टमंडळ

# 'नॅक'साठी विद्यापीठाचा अभ्यास

Anuradha.kadam
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT



## विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा

शिक्षण विद्यार्थीकेंद्री असावे या भूमिकेतून नव्या निकषाद्वारे मूल्यांकन प्रक्रियेची रचना करण्यात आली आहे. नॅकमार्फत मूल्यांकनासाठी विद्यापीठातील विविध अधिविभागांना भेट देण्यासाठी येणाऱ्या समितीकडून विद्यार्थ्यांशी संवाद साधला जातो. विद्यार्थ्यांचा अभिप्राय या प्रक्रियेत महत्त्वाचा आहे. या पार्श्वभूमीवर पुढील शैक्षणिक वर्षात विद्यापीठातील विविध अधिविभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नॅक समितीशी संवाद साधण्याबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यासाठी येत्या चार महिन्यात विद्यार्थ्यांसाठी विशेष संवादकौशल्य कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले आहे.

> यूजीसीतर्फे मिळणाऱ्या विस्तारीत निधीसाठी पुढील वर्षीपासून ३.५१ सीजीपीए असण्याचे बंधनकारक करण्यात येणार आहे. त्यामुळे नॅक मूल्यांकनामध्ये सीजीपीएचा आलेख वाढवण्याच्यादृष्टीने विचार करणे आवश्यक आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

> नॅक मूल्यांकनासाठी बदलण्यात आलेल्या नव्या निकषांनुसार नियोजनाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. संशोधनातून विकास तसेच कौशल्याधारित अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी यावर शैक्षणिक डेटा तयार करण्याचे काम सुरू आहे.
>
> – डॉ. आर. के. कामत, संचालक, अंतर्गत गुणवत्ता कक्ष, शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर :** राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) पथक ऑक्टोबर २०१९ मध्ये शिवाजी विद्यापीठाचे मूल्यांकन करण्यासाठी येणार आहे. यावर्षी नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया पद्धतीत बदल झाल्यामुळे नव्या निकषानुसार विद्यापीठाच्या दर्जात्मक व गुणात्मक मूल्यांकनाचा आलेख

## समिती नियुक्तीसह डेटासंकलनावर भर

वाढवण्यासाठी विद्यापीठाच्या नॅक विभागातर्फे तयारीला वेग आला आहे. समिती नियुक्तीसह डेटा संकलनावर भर देण्यासाठी नियोजन सुरू करण्यात आले आहे.

पुढील वर्षी शिवाजी विद्यापीठाचे चौथ्यांना मूल्यांकन होणार आहे. यावर्षी बदललेल्या प्रक्रियेनुसार ७० टक्के भाग हा विद्यापीठातील संख्यात्मक मूल्यांकनावर आधारित असेल. तर ३० टक्के भाग हा तज्ज्ञ समितीच्या भेटीअंतर्गत अहवालावर असेल.

नॅकअंतर्गत विद्यापीठाच्या मूल्यांकनासाठी ७ केंद्रभूत निकषांसह १२९ सर्वंकष निकष ठरवण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने संशोधन, आधुनिक शैक्षणिक सुविधा, कौशल्याधारित अभ्यासक्रम, पात्र अध्यापनवर्ग यांचा समावेश आहे. नॅकसाठी पहिल्या टप्प्यात सात विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये वार्षिक अहवाल, स्वयंअध्ययन आराखडा तयार करण्यात आला आहे. गेल्या तीन महिन्यांत नियुक्त करण्यात आलेल्या समिती सदस्यांची बैठक घेण्यात आली असून सध्या नॅकची तयारी नियोजन व चर्चा या स्तरावर सुरू झाली आहे. भविष्यात कौशल्यविकासाला चालना देणाऱ्या अभ्यासक्रमांची गरज लक्षात घेऊन रोबोटिक व आयओटी या अभ्यासक्रमांची सुरूवात येत्या शैक्षणिक वर्षापासून करण्यात आली आहे.

# विद्यापीठात आज क्रीडा कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (दि.२०) 'क्रीडा व्यवस्थापन' व 'क्रीडा क्षेत्रच का?' या दोन विषयांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११ वाजता कार्यशाळा असणार आहे. यावेळी शारीरिक शिक्षण संचालकांसह क्रीडा शिक्षक व मान्यवरांची उपस्थिती असेल. यावेळी तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठातील शिष्टमंडळाची विशेष उपस्थिती असणार आहे.

# ' मोतीबाग'च्या मल्लविद्येने तैवानचे शिष्टमंडळ प्रभावित

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात क्रीडाविषयी माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी तैवान येथून आलेल्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने गुरुवारी भेटीच्या दुसऱ्या दिवशी मंगळवार पेठ येथील मोतीबाग तालमीला भेट दिली.

यावेळी पैलवानांनी दाखवलेली प्रात्यक्षिके पाहून तैवान विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे अधिकारी प्रा. सिअँग लियू, प्रा. ह्युअँग यू हे अत्यंत प्रभावित झाले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर तसेच कोल्हापूर जिल्हा तालीम संघाचे प्रतिनिधी माजी महापौर महादेवराव अडगुळे, संभाजी वरुटे, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, महान भारत केसरी दादू चौगुले, हिंदकेसरी विनोद चौगुले, पै. संभाजी पाटील आदी उपस्थित होते. मल्लविद्येच्या शास्त्रोक्त माहितीसह या प्रात्यक्षिकांमध्ये कुस्तीपटूंनी करेलाचा वापर, ढाक लावणे, धोबी पछाड, मोळी आदी डावांचे सादरीकरण केले.

तत्पूर्वी, सकाळी विद्यापीठ परिसरामध्ये विविध ठिकाणी निर्माण केलेले जलसाठे पाहून शिष्टमंडळ अचंबित झाले. तद्नंतर शिष्टमंडळाने सेंट झेवियर्स शाळेस भेट दिली. या ठिकाणी बॅडमिंटन, टेबल टेनिस, स्केटिंग, फुटबॉल, बास्केटबॉल, क्रिकेट आदी खेळांच्या मैदानांसह विविध खेळांच्या प्रात्यक्षिकांची पाहणी केली. छत्रपती शहाजी महाराज संग्रहालयाच्या पाहणीनंतर आष्टा येथील आण्णासाहेब डांगे महाविद्यालयामधील विविध क्रीडाविषयक बाबींची माहिती घेण्यासाठी शिष्टमंडळ आष्ट्याकडे रवाना झाले.

# त्सिंगहुआ विद्यापीठाशी करार; शिवाजी विद्यापीठ देशात पहिले

## - प्रा. ह्युअँग यू यांची माहिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाचे भारतातील सत्तरहून अधिक विद्यापीठे आणि आघाडीच्या शैक्षणिक संस्थांशी विज्ञान, तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, ज्ञानविस्तार आदी क्षेत्रांतील आदान-प्रदानासंदर्भात सामंजस्य करार झालेले आहेत. तथापि, आमच्याशी क्रीडाविषयक सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे, असे उद्गार तैवान येथील त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू यांनी काढले.

तैवानच्या विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळ शिवाजी विद्यापीठासह परिसरातील क्रीडाविषयक सोयी-सुविधांची पाहणी करण्यासाठी तीन दिवसांच्या भेटीवर आले आहे. या शिष्टमंडळाचे स्वागत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

प्रा. यू म्हणाले, गेल्या महिन्यात कुलगुरू डॉ. शिंदे यांनी तैवान भेटीदरम्यान त्सिंगहुआ विद्यापीठासही भेट दिली होती. तेथेच त्यांनी विद्यापीठाशी क्रीडाविषयक आदान-प्रदान करण्यासंदर्भात सामंजस्य करार केला. स्पोर्टस् सायकॉलॉजी, कोचिंग लीडरशिप



**कोल्हापूर : महिला व पुरुष गटांच्या प्रदर्शनीय कबड्डी सामन्यांचे उद्घाटन करताना परदेशी पाहुणे.**

डेव्हलपमेंट, स्पोर्टस् ॲन्ड लीजर बिझनेस, टीम कन्सल्टेशन, स्पोर्टस् फंडिंग जनरेशन आदी बाबींबरोबर क्रीडा सुविधा विकासाच्या अनुषंगानेही आम्ही शिवाजी विद्यापीठास सहकार्य करू. त्याचप्रमाणे योगा, कबड्डी आणि कुस्तीसारख्या स्थानिक खेळांची शास्त्रशुद्ध माहिती व प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठाचे सहकार्य घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

कुलगुरू देवानंद शिंदे म्हणाले, या सामंजस्य कराराचा उभय विद्यापीठांतील क्रीडा विभाग अधिक सशक्त होण्यास निश्चितपणे मदत मिळणार आहे.

यावेळी विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षामार्फत तयार करण्यात आलेला विद्यापीठाचा माहितीपट शिष्टमंडळास दाखवण्यात आला. क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाच्या वाटचालीविषयी माहिती दिली. अनिल घुले यांनी प्रास्ताविक केले. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

यावेळी कुलसचिव विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डी. आर. मोरे, बाबासाहेब उलपे, अभिजित वणिरे आदी उपस्थित होते.

### कबड्डी सामन्याने पाहुणे प्रभावित

विद्यापीठाच्या लोककला सभागृहात महिला व पुरुष गटांच्या प्रदर्शनीय कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धकांची गती, तडफ आणि जिगरबाज खेळी पाहून दोघेही पाहुणे अत्यंत प्रभावित झाले.




**कोल्हापूर : मोतीबाग तालमीत कुस्ती लढत पाहताना तैवानमधील त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठातील प्रा. सिअँग लियू, प्रा. ह्यूंग यू यांच्यासमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर, दादू चौगुले, विनोद चौगुले, अॅड. महादेवराव आडगुळे.**

# 'त्सिंगहुआ'च्या शिष्टमंडळाची मोतीबाग तालीमला भेट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये क्रीडाविषयक माहितीची देवाण-घेवाण करण्यास तैवान येथून आलेले त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाचे शिष्टमंडळ मोतीबाग तालीमला भेट देऊन प्रभावित झाले. या वेळी मल्लांनी दाखविलेली प्रात्यक्षिके पाहून तैवान विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे अधिकारी प्रा. सिअँग लियू, प्रा. ह्यूंग यू यांनी त्यांचे कौतुक केले. मल्लविद्येची शास्त्रोक्त माहितीही त्यांना देण्यात आली. मल्लांनी करेलाचा व्यायामासाठी कसा वापर करावा, याचे सादरीकरण करत ढाक लावणे, धोबीपछाड, मोळी डाव दाखवले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कोल्हापूर जिल्हा तालीम संघाचे अॅड. महादेवराव अडगुळे, संभाजी वरूटे, संभाजी पाटील, हिंद केसरी दीनानाथ सिंह, रुस्तम-ए-हिंद दादू चौगुले, हिंदकेसरी विनोद चौगुले उपस्थित होते. तत्पूर्वी सकाळी विद्यापीठ परिसरामध्ये विविध ठिकाणी निर्माण केलेले जलसाठे शिष्टमंडळाने पाहिले. शिष्टमंडळाने सेंट झेवियर्स हायस्कूलला भेट दिली. बॅडमिंटन, टेबल टेनिस, स्केटिंग, फुटबॉल, बास्केटबॉल, क्रिकेट खेळांच्या मैदानासह अन्य खेळांच्या प्रात्यक्षिकांची पाहणी केली. छत्रपती शहाजी महाराज संग्रहालयाच्या पाहणीनंतर आष्टा येथील आण्णासाहेब डांगे महाविद्यालयामधील विविध क्रीडाविषयक बाबींची माहिती घेण्यासाठी शिष्टमंडळ आष्ट्याकडे रवाना झाले.

# तैवानच्या पाहुण्यांनी पाहिला कबड्डी सामना

## शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलासही भेट

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठात अभ्यास दौऱ्यावर आलेल्या तैवानच्या शिष्टमंडळाने आज कबड्डी सामन्याचा आनंद घेतला.

खेळाडूंचा जिगरबाज खेळ पाहून त्यांना आनंद झाला. त्यानंतर त्यांनी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलालाही भेट दिली.

तैवानचे एक शिष्टमंडळ शिवाजी विद्यापीठात अभ्यास दौऱ्यासाठी आले. आज त्यांनी विद्यापीठातील विविध विभागांना भेटी दिल्या.

स्वागत समारंभानंतर तैवानच्या शिष्टमंडळासाठी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात महिला व पुरुष गटाच्या प्रदर्शनीय कबड्डी सामन्यांचे आयोजन केले. प्रदर्शनीय सामन्यात सहभागी चारही संघांच्या खेळाडूंना त्यांनी सुरवातीला शुभेच्छा दिल्या. पाहुण्यांच्या हस्ते नाणेफेक करून सामन्यांचे उद्घाटन केले. स्पर्धकांची गती, तडफ आणि जिगरबाज खेळी पाहून दोघेही पाहुणे प्रभावित झाले. व्यासपीठावरील आसने सोडून खाली मैदानाजवळ जाऊन त्यांनी या खेळाडूंचे मोबाईलवर चित्रीकरणही केले.

### महाविद्यालयाच्या जलतरण तलावाचीही पाहणी

**त्यानंतर शिष्टमंडळाने विद्यापीठाच्या क्रीडा संकुलास भेट देऊन तेथील सोयी-सुविधांची, विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकची पाहणी केली. दुपारच्या सत्रात मोरेवाडी येथील शांतिनिकेतन शाळा येथील क्रीडा सुविधा आणि शाहू महाविद्यालयाच्या जलतरण तलावाचीही पाहणी त्यांनी केली.**



**कोल्हापूर : तैवानच्या शिष्टमंडळातील सदस्यांनी नाणेफेक करून कबड्डी सामन्याची सुरवात केली.**

एखादी चाल अगर पकड झाल्यानंतर त्याविषयी तसेच गुणांकनाविषयी वेळोवेळी डॉ. गायकवाड आणि डॉ. घुले यांच्याकडून त्याविषयी अधिक जाणूनही घेत होते. सामना संपल्यानंतर सर्व खेळाडूंनी दोन्ही बाजूंना उभे राहून पाहुण्यांना मानवंदना दिली.